# पाकिस्तानी पत्रकाराची हत्या, कटार-युरोप

चन्द्रशेखर पुरन्दरे

## पाकिस्तानी पत्रकाराची हत्या

आज जगात अनेक देशांत 'गैरसोयी'चे पत्रकार, बुद्धिजीवी त्यांच्या राजकीय भूमिकेमुळे सत्ताकेंद्रांचे लक्ष्य झालेले आहेत. ही केंद्रे म्हणजे देशाचे सरकार, लष्कर, पोलिस किंवा आपल्याकडच्यासारखे अशासकीय अति-उजवे गट. या भिन्न केंद्रांचे प्रसंगी संगनमतही असू शकते. उदा. गोध्रा हत्याकांड; पानसरे-कलबुर्गी-गौरी लंकेश यांचे खून. चीन, इराणसारख्या देशात तर सरकार, पोलिस, लष्कर यांच्याबरोबरीने न्यायसंस्थाही एकपक्षीय सरकारची री ओढते. हाच प्रकार रशियात आणि जरा मवाळ स्वरूपात तुर्कस्तानासारख्या इतर देशांत. त्यामुळे प्रशासनावर अंकुशच रहात नाही.

विरोधक परदेशी स्थायिक झाले तरी तेथे जाऊन त्यांची हत्या केली जाते, स्टॅलिनच्या काळापासून रशिया, सध्याचा चीन, उत्तर कोरिया हे असे राजमान्य खून करतात. अलिकडचे उदाहरण म्हणजे, २०१८ ला सौदी राजपुत्राने विरोधी पत्रकाराची हत्या तुर्कस्तानात करवली. (*आंदोलन, मार्च २०१९.)*

याच मालिकेत २३ ऑक्टोबर २०२२ ला अर्शद शरीफ या पाकिस्तानी पत्रकाराची केनिया देशांत हत्या झाली. ARY या पाकिस्तानी न्यूज चॅनलचा तो ऑगस्टपर्यन्त पत्रकार होता. त्याच्या कामाचा गौरव म्हणून त्याला पाकिस्तानचे राष्ट्रपतिपदक व इतरही आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते. तो आधी पाकिस्तानी लष्कराचा समर्थक होता. पण एप्रिल २०२२ ला इम्रान खानचा पाठिंबा लष्कराने पडद्यामागून काढून घेतला व तो पदच्युत झाला. नवीन सरकार पाकिस्तानी परंपरेनुसार अर्थातच लष्कराच्या मान्यतेने आले. तेव्हापासून अर्शद शरीफ लष्कराचा टीकाकार झाला व त्याच्या राजकीय त्रासाची सुरुवात झाली. त्याने इम्रान खानच्या आता विरोधी पक्षाच्या एका पदाधिकाऱ्याची मुलाखत त्याच्या चॅनेलवरून प्रसृत केली. त्यावरून चॅनेलच्या प्रमुख अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचे आरोप करण्यात आले, चॅनेलचे ना-हरकत प्रमाणपत्रही सरकारने रद्द केले. मग त्या चॅनेलने अर्शदशी संबंध संपले असे जाहीर केले.

या परिस्थितीत पाकिस्तानात रहाणे अवघड आहे असे लक्षात येऊन ऑगस्टमध्ये देश सोडून तो प्रथम दुबईला गेला व तेथून केनियाला.

केनियाची राजधानी नैरोबी. तिच्याजवळच्या हायवेवर त्याच्या गाडीवर केनियाच्या पोलिसांनी गोळीबार केला व त्यात तो मृत्यू पावला. पोलिसांच्या सांगण्याप्रमाणे गाडी थांबवायला सांगूनही थांबली नाही म्हणून गोळीबार करण्यात आला. पोलिसांच्याच दुसऱ्या निवेदनानुसार अर्शद हा लक्ष्य नव्हताच. गोळीबार झाला तो अर्शद हा दुसराच एक इसम आहे अशा समजुतीने. पाकिस्तानच्या गृहमंत्र्याच्या मते हत्येचे उद्दिष्ट अर्शदला ठार मारणे हेच होते तर पाकिस्तानच्याच एका लष्करी अधिकाऱ्याने यामागे नक्की कोण हे सांगता येणार नाही अशी भूमिका घेतली. म्हणजे कोणत्याही दोन विधानांत एकवाक्यता नाही. सरकारने एक चौकशी समिती स्थापन केली, त्यांचा अहवाल डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झाला.

त्यानुसार पाकिस्तान, दुबई, केनिया या देशांतील अनेक शासकीय उच्चपदस्थ या हत्येत सहभागी असावेत. त्यांच्या जबाबांमध्ये परस्परविरोधी वक्तव्ये दिसली. अर्शदला दुबई सोडायला भाग पाडण्याचे दडपणही दुबई सरकारवर आले असावे. थोडक्यात, केनियाच्या मानवी हक्क संघटनेने म्हटल्याप्रमाणे हा काटेकोर आखलेला पूर्वनियोजित कट होता. जबाबदार कोण हे आज अनिश्चित आहे आणि कदाचित कधीच कळणार नाही.

दरम्यान पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टानेही या घटनेची स्वत:हून दखल घेतली व सरकारला आणखी एक चौकशी समिती नियुक्त करायचा आदेश दिला. अर्शदच्या आईने पाकिस्तानचे वरिष्ठ लष्करी अधिकारी, गुप्तहेर संघटनेचे अधिकारी

हे गुन्हेगार आहेत असे स्पष्ट आरोपपत्र व अर्ज सुप्रीम कोर्टात केला आहे, कोर्टाने त्या अर्जाची दखल घेतली आहे.

जागतिक स्तरावर चित्र पहाता १९९३ पासून आजवर १५०० हून अधिक पत्रकार ठार मारले गेले. २०१२१ला ४७, २०२२ला ६७. म्हणजे आकडा वाढत आहे. शिवाय या ना त्या कारणासाठी तुरुंगात टाकलेले बुद्धिजीवी, पत्रकार निराळेच (भीमा –कोरेगाव).

तात्पर्य, वर्तमानकाळ विचार–प्रचार स्वातंत्र्याला बऱ्याच देशांत अनुकूल नाही.

**कटार – युरोप**

मध्य पूर्वेतील कटार या अरब देशात २०२२ च्या जागतिक फुटबॉल स्पर्धा झाल्या. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यजमानपद अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, द. कोरिया या विकसित देशांऐवजी कटारला मिळाले. तेव्हापासूनच ते मिळावे म्हणून कटारने संबंधितांना प्रचंड लाच दिली असावी अशी चर्चा होती.

कटार ही पारंपरिक हुकूमशाही आहे. तेल आणि नैसर्गिक गॅस निर्यातीमुळे देश अतिश्रीमंत आहे. दरडोई उत्पन्नात तो जगात अगदी वर आहे. एकूण लोकसंख्या २८-२९ लाख, पण २० लाखांहून जास्त बाहेरच्या देशातून आलेले मजूर. त्यात भारतीय सुमारे ७ लाख, मग बांगलादेशी , नेपाळी प्रत्येकी ४ लाख, मग पाकिस्तानी, वगैरे.

वर्ल्ड कपसाठी अनेक स्टेडियम्स, हॉटेल्स, रस्ते अल्पावधीत उभे करणे आवश्यक होते. या बांधकामासाठी आलेल्या विदेशी मजुरांची देखभाल कटारने नीट केली नाही. उदा. कामावर असताना अनेक मजुरांचे अपघाती मृत्यू झाले. खूप उंच बांधकामावरून पडणे, अंगावर जड यंत्रसामग्री पडणे, अतिउष्ण हवामानात अंगमेहेनत. यामुळे अकाली मृत्यू होतात.वर्ल्ड कपसाठी काम सुरू झाल्यावर नोव्हेंबरपर्यन्त सुमारे साडेसहा हजार मजूर मरण पावले असा अंदाज स्वयंसेवी संघटनांचा तर कटार सरकारच्या मते फक्त तीन लोक मरण पावले. आकड्यातील ही तफावत लक्षणीय. त्यात मृत्यूची नोंद शास्त्रीय नसते, पोस्टमॉर्टेम नाही. नैसर्गिक कारणाने किंवा हृदयविकाराने मृत्यू अशी सरसकट नोंद होते. ७० टक्के भारतीय उपखंडातील मजुरांच्या मृत्यूची नोंद अशी झालेली आहे. इतर व्याधिग्रस्त अलगच. त्यांच्या कामावरच्या सुरक्षेची योजना नाही व तसा कायदाही नाही.

या बेपर्वाईमुळे स्पर्धा जवळ येऊ लागल्या तसे विशेषत: पाश्चात्य देशांत कटारविरुद्ध मत होऊ लागले.. मग कटारने दोन मार्ग स्वीकारले. एक वारेमाप आश्वासने दिली की आम्ही मजुरांची पाश्चात्य मानकाने देखभाल करू. पण तेवढ्याने जनमत अनुकूल होणार नाही याचा अंदाज येऊन दुसरा मार्ग - युरोपातील लोकप्रतिनिधींना कटार पुरस्कारासाठी लाच.

अशा लाचखोरीचे प्रकरण आता युरोपात गाजत आहे. २७ युरोपियन देशांची स्वतंत्र युरोपियन संसद असते. त्यात या देशांचे खासदार थेट निवडून येतात. त्या त्या देशांची संसद, खासदार निराळे. ते त्या त्या देशाचे सरकार निवडतात, चालवतात. या संसदेत ग्रीस देशाची अशी एक खासदार व युरोपियन युनियनची एक उपाध्यक्ष - इवा केली. युनियनचे ऑफिस ब्रसेल्स या बेल्जियम देशाच्या राजधानीत असते. तेथील पोलिस तिच्या हालचालींवर वर्षभर लक्ष ठेवून होते. स्पर्धा सुरू होण्याआधी ती कटारला जाऊन आली. दुसऱ्याच दिवशी तिने संसदेत कटारचा उदो उदो सुरू केला. 'इतर अरब देशांनी अनुकरण करावे अशी व्यवस्था कटार विदेशी कामगारांसाठी करत आहे, खेळाच्या यजमानपदाने देशाचे धोरण विदेशी कामगारांना कसे अनुकूल होते याचे कटार हे उदाहरण आहे आणि हे प्रतिपादन करणाऱ्यांवर टीकाकार भ्रष्टाचाराचा आरोप करतात', वगैरे. कटारच्या नागरिकांना युरोपला यायला व्हिसाची जरूरी नसावी असा धोरणबदल करण्याचाही तिचा प्रयत्न होता.

९ डिसेंबरला १६ ते २० ठिकाणी धाडी टाकून ब्रसेल्स पोलिसांनी एकूण सुमारे १६ लाख डॉलर्स रोख जप्त केले. त्यातील निम्मे ब्रसेल्समधील इवा केलीच्या वडिलांकडे होते. दीड लाख डॉलर्स इवा केलीच्या फ्लॅटमध्ये मिळाले. चार जणांना अटक झाली. त्यात एक इवा केली, दुसरा तिचा पार्टनर, तिसरा संसदेतील आणखी एक खासदार त्याच्याकडे सहा लाख डॉलर्स होते. इवाचा पार्टनर या खासदाराच्या ऑफिसमध्ये कामाला होता. पैसे द्या, तुमची भलावण करतो हा प्रकार युरोपच्या संसदेत घडावा हे धक्कादायक आहे.

रॉबर्टा मेट्सोला ही युरोपियन संसदेची अध्यक्षा. तिने अपराध्यांना शासन होईल अशी ग्वाही दिली. पोलिस, युरोपियन युनियन यांनी त्यांची कारवाई सुरू केली आहे. इवा केलीला संसदेतून व उपाध्यक्ष पदावरून हटवण्यात आले. तिच्या ग्रीस देशाने तिला पक्षातून बाहेर काढले, तिच्या तेथील मालमत्तेवर टाळे ठोकले व तिच्या बाकी व्यवहारांची चौकशीही सुरू केली आहे. इवा केलीने सगळे आरोप अमान्य केले आहेत. कटारनेही या लाचखोरीबाबत हात झटकले आहेत.

खरे तर गुन्हा उघडकीला आल्यावर त्यावर कायदेशीर कारवाई सुरू होणे हा फक्त मर्यादित उपचार आहे. तो दोन जागतिक प्रश्नांच्या मुळाशी जात नाही.

पहिला म्हणजे, असे गैरप्रकार करण्यापासून राजकारणी कायमचे कसे परावृत्त होतील. दुसरा, अधिक क्लिष्ट प्रश्न म्हणजे, लोकांची उदासीनता. वर्ल्ड कप सुरू होण्याआधीपासून म्हणजे २० नोवेंबरच्या आधीपासून कटारमध्ये मजुरांचे हाल होत आहेत हे जाहीर होत होते. पण त्यामुळे काही १२-१३ लाख फुटबॉलप्रेमींचा कटारला जाण्याचा इरादा बदलला नाही. इवा केली प्रकरण ९ डिसेंबरला उघड झाले. म्हणजे वर्ल्ड कप चालू असताना. आधीचे आरोप सोडा, पण ९ डिसेंबरनंतरही लोकांनी भ्रष्टाचाराचा निषेध केला नाही, स्पर्धेवर बहिष्कार दूरच. 'त्यांच्या' भ्रष्टाचाराशी 'आमचा' संबंध नाही ही वृत्ती आक्षेपार्ह आहे, ती भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. त्या उदासीनतेला उत्तर नाही.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk